
# श्रीगुरूंचें गंधर्वपूर


## श्रीक्षेत्र गाणगापूर

१९६२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ५१५



REFBK-0012994



सन १९६२
७५९८९
२२।३।७९
५९५

# श्रीगुरूंचें गंधर्वपूर

## श्रीक्षेत्र गाणगापूर

म्हणे सरस्वती गंगाधर।
क्षेत्र थोर गाणगापूर।
तीर्थें असतीं अपरांपर।
आचरा तुम्ही भक्तीनें॥
– गुरुचरित्र, ४८.१०५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२९९८

रामचंद्र चिंतामण ढेरे

किंमत
६२
नये पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७५९८९ दि. २२।३।७९
५९५
REFBK-0012994

वोरा अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : २८

श्री : ११५ : २[९-६२]
Copyright १९६२
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

●

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : १८

●

आवृत्ति दुसरी
१९६२

●

किंमत ६२ नये पैसे

●

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

●

प्रकाशक
अ. ल. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी
पब्लि. प्रायव्हेट लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

●

मुद्रक
अनंत कृष्ण कुलकर्णी
आनंद प्रिंटिंग प्रेस
सातारा प्रायव्हेट लि.,
१८२, सोमवार पेठ,
सातारा शहर

# श्री गुरूचें गंधर्वपूर

१२९८४


## भक्ति-सरिता भीमा :

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासांत गोदावरीइतकेंच भीमेचेंहि महिमान आहे. गोदावरीनें अनैतिहासिक काळापासून या भूमीचा अन्तर्बाह्य विकास साधला आहे, तर भीमेचें महिमान मध्ययुगांत उदय पावलें आहे. भक्तीला भुललेला पांडुरंग जेव्हां पुंडलिकासाठीं हिच्या कांठीं उभा राहिला, त्या क्षणापासून भीमेच्या जळराशींत पतितांना पावन करण्याचें आणि पाषाणांत प्राण ओतण्याचें अमोघ सामर्थ्य निर्माण झालें. पुंडलिकानंतर नामदेवानें आपल्या भावविव्हलतेनें विठ्ठलाला वेड लावलें आणि तो भावाचा भुकेला प्रभु पाषाणांची खोळ टाकून देऊन, याच भीमेच्या कांठीं नामयाशीं सुखसंवाद करूं लागला. नामयाच्या भक्तीशीं ज्ञानदेवांच्या ज्ञानाचा सुरेख संगम झाला, तोहि या भीमेच्या वाळवंटांतच. त्या भक्ति-ज्ञानाच्या संगमानें भीमेचा आत्मगौरव सहस्रधारांनीं वाहूं लागला आणि मग सह्यगिरीच्या कडेकपारींतून महाराष्ट्राची आत्मशक्ति 'अहं ब्रह्मास्मि'चा गगनभेदी उद्घोष करीत जागी झाली. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या संजीवक सह-वासानें भारलेल्या भक्तांच्या भावनेमुळें भीमा ही भक्तिसरिता बनली. तिच्या कांठीं जणुं वैकुंठ नांदावयास आलें. शाश्वत संस्कृतीचा अमोल ठेवा वागवणारी वृद्ध गोदावरीहि नाथांच्या रूपानें भीमेच्या भेटीसाठीं झेपावूं लागली. आणि अखेर

भागवत धर्माच्या महामंदिरावर कळस चढविणाऱ्या तुकारामानें भीमेला भक्तीचें प्रतीकच बनवून टाकलें. ज्ञानदेवांच्या परंपरेंतील एका अनुभव संपन्न भक्तानें—

भक्तिभीमेचा तीरीं । प्रतीति-विटेवरी ।
समानी पदीं श्रीहरी । देखिला उभा ॥ — शिवकल्याण

असा आपला अनुभव नोंदविला आहे ! भीमेच्या या भक्ति-गौरवानें महाराष्ट्राच्या सीमा उल्लंघून कर्नाटकावरहि अधिराज्य गाजवलें आहे. महाराष्ट्रांतील विठ्ठलभक्त 'वारकरी', तर कर्नाटकांतील विठ्ठलभक्त 'हरिदास'. या हरिदासांचा 'दासकूट' संप्रदाय नाथांच्या पूर्वकाळापासून भीमेच्या तीरीं नांदणाऱ्या विठ्ठलाच्या दर्शनासाठीं गर्दी करीत आला आहे. महाराष्ट्र-कर्नाटकाच्या हृदयांची मिळणी साधणारा आणखी एक दुवा चौदाव्या शतकांत भीमेनें निर्माण केला. तो दुवा म्हणजे दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती यांच्या प्रदीर्घ निवासानें पावन



भीमेकांठचें गाणगापूर

झालेलें भीमेकांठचें गाणगापूर. पंढरपूर महाराष्ट्रांत आहे, तर गाणगापूर कर्नाटकांत. पंढरीच्या ओढीनें कानडी भक्त महाराष्ट्राकडे धांव घेतात, तर गाणगापूरच्या ओढीनें मराठी भक्त कर्नाटकाकडे धांव घेतात. या दोन तीर्थक्षेत्रांमुळें भक्ति-सरिता भीमा हें कर्नाटक-महाराष्ट्राच्या एकात्मतेचें चिरन्तन प्रतीक बनलें आहे.

कृष्णा-तीर ते भीमा-तीर :


गेलीं चार-पांचशें वर्षें महाराष्ट्रांत सार्वत्रिक श्रद्धेचा विषय बनलेला 'गुरुचरित्र' हा ग्रंथ श्रीनरसिंह सरस्वतींचें चरित्र विवरणारा आहे. ते दत्तावतार समजले जातात. त्यांच्या अवतारामुळें महाराष्ट्रांत दत्तभक्तीचा अबाध प्रवाह वाहत राहिला. त्यांचा जन्म शके १३०० च्या सुमारास वऱ्हाडांत लाड-कारंजा येथें झाला. त्यांनीं समर्थ रामदासांप्रमाणें वयाच्या आठव्या वर्षीं घर सोडलें; काशीस जाऊन संन्यास घेतला आणि तीस वर्षे उत्तर भारतांत तीर्थभ्रमण करून व अनेकांना ज्ञानदान करून शके १३४० च्या सुमारास ते महाराष्ट्रात परत आले. यवनांच्या आक्रमणांनीं आणि अत्याचारांनीं संत्रस्त झालेल्या हिंदु प्रजेची दारुण स्थिति त्यांनीं आपल्या उत्तरयात्रेंत डोळसपणें न्याहाळली होती. महाराष्ट्रांत परत आल्यावर महाराष्ट्रहि त्याच आपत्तींत सांपडलेला त्यांना दिसला. विजय-नगरचें नवजात हिंदु साम्राज्यहि यवनांच्या आघातांनीं संत्रस्त झालें होतें. महाराष्ट्रांतील क्षात्रतेज यवनसेवेंत रुजू झालें होतें आणि ब्राह्मणांनीं स्वधर्मसंरक्षणाचें व जनशिक्षणाचें व्रत सोडून दंभ आणि लाचारी पत्करली होती. या असहाय परिस्थितींत विद्यारण्यस्वामींच्या परंपरेंतील या कर्मयोगी संन्याशानें समाजांत स्वधर्मसंरक्षणाची ज्वलन्त जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न आरंभिला आणि महाराष्ट्रांतील स्वातंत्र्याच्या उत्थानाचीं बीजें कळत-नकळत पेरून ठेवलीं.

गोदावरीची प्रदक्षिणा करून ते आंबे जोगाई येथें आले. तेथें वर्षभर राहिले आणि नंतर कृष्णाकांठीं भिलवडीजवळ औदुंबर येथें चातुर्मास काढून ते कृष्णा-पंचगंगा संगमावर (नरसोबाची वाडी) १२ वर्षें राहिले. त्यानंतर शके १३५६ च्या सुमारास ते कृष्णाकांठ सोडून भीमेच्या कांठीं गाणगापूर येथें

भागवत धर्माच्या महामंदिरावर कळस चढविणाऱ्या तुकारामानें भीमेला भक्तीचें प्रतीकच बनवून टाकलें. ज्ञानदेवांच्या परंपरेंतील एका अनुभव संपन्न भक्तानें–

भक्तिभीमेचा तीरीं । प्रतीति-विटेवरी ।
समानी पदीं श्रीहरी । देखिला उभा ।। – शिवकल्याण

असा आपला अनुभव नोंदविला आहे ! भीमेच्या या भक्तिगौरवानें महाराष्ट्राच्या सीमा उल्लंघून कर्नाटकावरहि अधिराज्य गाजवलें आहे. महाराष्ट्रांतील विठ्ठलभक्त 'वारकरी', तर कर्नाटकांतील विठ्ठलभक्त 'हरिदास'. या हरिदासांचा 'दासकूट' संप्रदाय नाथांच्या पूर्वकाळापासून भीमेच्या तीरीं नांदणाऱ्या विठ्ठलाच्या दर्शनासाठीं गर्दी करीत आला आहे. महाराष्ट्र-कर्नाटकाच्या हृदयांची मिळणी साधणारा आणखी एक दुवा चौदाव्या शतकांत भीमेनें निर्माण केला. तो दुवा म्हणजे दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती यांच्या प्रदीर्घ निवासानें पावन



भीमेकांठचें गाणगापूर

झालेलें भीमेकांठचें गाणगापूर. पंढरपूर महाराष्ट्रांत आहे, तर गाणगापूर कर्नाटकांत. पंढरीच्या ओढीनें कानडी भक्त महाराष्ट्राकडे धांव घेतात, तर गाणगापूरच्या ओढीनें मराठी भक्त कर्नाटकाकडे धांव घेतात. या दोन तीर्थक्षेत्रांमुळें भक्ति-सरिता भीमा हें कर्नाटक-महाराष्ट्राच्या एकात्मतेचें चिरन्तन प्रतीक बनलें आहे.

कृष्णा-तीर ते भीमा-तीर :

गेलीं चार-पांचशें वर्षें महाराष्ट्रांत सार्वत्रिक श्रद्धेचा विषय बनलेला 'गुरुचरित्र' हा ग्रंथ श्रीनरसिंह सरस्वतींचें चरित्र विवरणारा आहे. ते दत्तावतार समजले जातात. त्यांच्या अवतारामुळें महाराष्ट्रांत दत्तभक्तीचा अबाध प्रवाह वाहत राहिला. त्यांचा जन्म शके १३०० च्या सुमारास वऱ्हाडांत लाड-कारंजा येथें झाला. त्यांनीं समर्थ रामदासांप्रमाणें वयाच्या आठव्या वर्षी घर सोडलें; काशीस जाऊन संन्यास घेतला आणि तीस वर्षें उत्तर भारतांत तीर्थभ्रमण करून व अनेकांना ज्ञानदान करून शके १३४० च्या सुमारास ते महाराष्ट्रांत परत आले. यवनांच्या आक्रमणांनीं आणि अत्याचारांनीं संत्रस्त झालेल्या हिंदु प्रजेची दारुण स्थिति त्यांनीं आपल्या उत्तरयात्रेंत डोळसपणें न्याहाळली होती. महाराष्ट्रांत परत आल्यावर महाराष्ट्रहि त्याच आपत्तींत सांपडलेला त्यांना दिसला. विजय-नगरचें नवजात हिंदु साम्राज्यहि यवनांच्या आघातांनीं संत्रस्त झालें होतें. महाराष्ट्रांतील क्षात्रतेज यवनसेवेंत रुजू झालें होतें आणि ब्राह्मणांनीं स्वधर्मसंरक्षणाचें व जनशिक्षणाचें व्रत सोडून दंभ आणि लाचारी पत्करली होती. या असहाय परिस्थितींत विद्यारण्यस्वामींच्या परंपरेंतील या कर्मयोगी संन्याशानें समाजांत स्वधर्मसंरक्षणाची ज्वलन्त जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न आरंभिला आणि महाराष्ट्रांतील स्वातंत्र्याच्या उत्थानाचीं बीजें कळत-नकळत पेरून ठेवलीं.

गोदावरीची प्रदक्षिणा करून ते आंबे जोगाई येथें आले. तेथें वर्षभर राहिले आणि नंतर कृष्णाकांठीं भिलवडीजवळ औदुंबर येथें चातुर्मास काढून ते कृष्णा-पंचगंगा संगमावर (नरसोबाची वाडी) १२ वर्षें राहिले. त्यानंतर शके १३५६ च्या सुमारास ते कृष्णाकांठ सोडून भीमेच्या कांठीं गाणगापूर येथें

येऊन राहिले आणि तेथें दोन तपांएवढा प्रदीर्घ काळ जन-जागृतींत आणि ज्ञानदानांत व्यतीत करून शके १३८० मध्यें त्यांनीं श्रीशैल येथें शिवस्वरूपाचा स्वीकार केला. प्रबोधनाच्या महान् कार्यामुळें आणि दत्तस्वरूप पावल्यामुळें त्यांना 'श्रीगुरु' हें बिरुद प्राप्त झालें आहे.

## भीमा-अमरजेच्या संगमावर.

गाणगापूर हें स्थान सध्यांच्या म्हैसूर राज्यांतील गुलबर्गा जिल्ह्यांत भीमा-अमरजेच्या संगमावर आहे. गुरुचरित्रांत गाणगापूरचा उल्लेख गाणगापूर, गाणगाभवन, गंधर्वभवन, गंधर्वपूर या नांवांनीं आढळतो. वाडीवरून श्रीगुरु गाणगापुरीं आले आणि संगमस्थानीं निसर्गाच्या रमणीय सान्निध्यांत वसति करून राहिले. हें संगमस्थान गाणगापूर गांवाच्या नैर्ऋत्य दिशेस सुमारें दोन मैल अंतरावर आहे. संगमाकडे जाण्याचा रस्ता नदीच्या किनाऱ्यानेंच गेलेला आहे. येथें पूर्ववाहिनी अमरजा व उत्तरवाहिनी भीमा यांचा संगम झाला आहे.

भीमेचें महिमान पुराणें आणि संत-वचनें यांत मुक्तपणें गाइलेलें आहे. गुरुचरित्रांत (अध्याय ४८) अमरजेच्या उत्पत्ती-विषयीं एक पुराणकथा आलेली आहे: फार पूर्वी जालंधर नामक दैत्य अत्यंत मातला आणि त्यानें सारी वसुंधरा संत्रस्त बनविली. देव-दानवांच्या रणधुमाळींत इंद्रासहित सारे देव पराभूत झाले. जालंधराच्या किमयेमुळें दैत्यांच्या रक्ताच्या बिंदूबिंदूंतून पुनः दैत्य निर्माण होत. या अरिष्टाचा प्रतिकार कसा करावा, हें सुचेनासें झाल्यावर इंद्र शिवाकडे गेला आणि सारें शोचनीय वृत्त त्यानें शिवास निवेदन केलें. तें वृत्त ऐकून शिव क्रोधाविष्ट झाला आणि रौद्रावतार धारण करून दैत्यांच्या निर्दाळणासाठीं निघाला. त्या वेळीं मृत देवांच्या संजीवनासाठीं

त्यानें इंद्राजवळ जो अमृतघट दिला, त्या अमृतघटांतील उरलेल्या अमृताचा ओहळ म्हणजेच ही अमरजा नदी. तिचा उद्भव देवांच्या संजीवनासाठीं आणि दैत्यांच्या संहारणासाठीं प्रवृत्त झालेल्या शिवाच्या करांतील अमृतघटांतून झालेला आहे, असें ही पुराण-कथा सांगते. अमरजेनें ज्या भीमेच्या जीवनांत समरसीकरण साधलें आहे, ती भीमाहि संतांच्या संस्पर्शामुळें आणि पांडुरंगाच्या चरणतीर्थामुळें मानवाच्या हृदयांतील देवत्वाचें संजीवन घडवीत आहे आणि दानवत्व संहारीत आहे. अशा या दोन सरितांचा संजीवक-संगम श्रीगुरूंना अनुष्ठान-योग्य वाटला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

विशेष भीमानदी उत्तरे वाहे । अमरजा संगम मनोहर आहे ।
गंगा यमुना निर्धार हे । तीर्थ बरवे परियेसा ॥

– गुरुचरित्र ४८ · ११

या संगमांत श्रीगुरूंच्या हृदयांतील व्यापक अनुभूतीची सरस्वती समरसूं लागली आणि त्याला त्रिवेणी-संगमाचें पुण्य-पावन स्वरूप प्राप्त झालें.

संगमाच्या कांठावर, कांहींशा उंचीवर, तरुवेलींची दाटी होती. त्यांत एक छायाघन अश्वत्थ एखाद्या तपोनिधीसारखा शीतोष्णाला न जुमानतां आकाशाचा अर्थ समजून घेत उभा होता. त्या अश्वत्थाखालीं श्रीगुरूंनीं अनुष्ठान चालू ठेवलें. संगमावर प्रभातींच स्नान उरकायचें, जळलहरींवर सोनेरी किरणांचा वर्षाव करीत येणाऱ्या सूर्याला अर्घ्य द्यायचें आणि विहंगमांच्या सामगायनाच्या साथीनें तरुतळीं तपाला आरंभ करायचा. माध्यान्ह झाल्यावर गांवांत भिक्षेला जायचें आणि पुनश्च एकान्तांत चिन्तन-मननांत मग्न व्हायचें. मानवाच्या शाश्वत सुखाचें रहस्य उलगडून त्याची वाट सर्वसाधारणांना सुगम करून देणें हा तर त्यांच्या चिन्तनाचा विषय होताच,



संगमावरील तपोवन

परंतु त्या काळांत महाराष्ट्र यवनांनीं व्यापल्यामुळें उद्ध्वस्त होऊं लागलेलें समाजजीवन, ब्राह्मण-क्षत्रियांनीं केवळ चर्म-रक्षणासाठीं आणि उदरंभरणासाठीं यवनसेवा पत्करल्यामुळें पोरका झालेला स्वधर्म आणि धर्मप्रसाराच्या निमित्तानें यवनां-कडून धर्माच्या प्राणभूत मूल्यांची चाललेली पायमल्ली – हें सर्व श्रीगुरुंच्या हृदयाला अस्वस्थ करीत होतें. सर्वसाधारण जनांच्या व्यथा-वेदनाहि त्यांना व्यथित करीत होत्या.

गाणगापूर हें ब्राह्मणांना 'अग्रहार' म्हणून मिळालेलें गांव होतें. तेथें शंभराहून अधिक ब्राह्मणांचीं घरें होतीं. विद्येनें प्रति-ष्ठित आणि परिस्थितीनें सुस्थित असे अनेक ब्राह्मण गांवांत होते. परंतु श्रीगुरु एका गरीब ब्राह्मणाच्या घरींच नित्य भिक्षेला जात. त्या ब्राह्मणाच्या घरीं एक भाकड म्हैस होती. त्या म्हशीच्या पाठीवरून खारी माती वाहून लोकांच्या बागाइतीला खत म्हणून देण्याचा उद्योग तो करीत असे. एके दिवशीं श्रीगुरुंच्या कृपाप्रभावामुळें त्या वांझ म्हशीला पान्हा फुटला आणि त्या क्षणापासून त्या निष्कांचन ब्राह्मणाच्या ओसाड

जीवनांत भाग्याची अमृतधारा वाहूं लागली, अशी कथा गुरुचरित्रांत वर्णिली आहे. या घटनेमुळें संगमावर अज्ञात अवस्थेंत अनुष्ठान आचरणारे श्रीगुरु गांवकऱ्यांच्या आश्चर्याचा आणि आदराचा विषय बनले. ग्रामाधिकाऱ्याच्या कानीं हें वृत्त पडल्यावर तो विनीतभावानें श्रीगुरूंकडे गेला आणि त्यानें त्यांना आग्रहानें गांवांत रहावयास आणलें. गांवांत रहावयास आल्यानंतरहि श्रीगुरु अनुष्ठानासाठीं नित्य संगमावर जात असत.


श्रीगुरूंच्या या तपोभूमींत प्रवेशल्यावर आजहि हृदय प्रसन्न होतें. या स्थानीं अजूनहि कांहीं वृक्ष उभे आहेत आणि आपल्या शीतल छायेनें ते यात्रिकांना श्रीगुरूंच्या कृपाकराचा स्निग्ध स्पर्श अनुभवावयास लावीत आहेत. खालीं भीमा-अमरजेचा मधुर संगम – श्रीगुरूंच्या नित्यस्पर्शानें पुण्यपावन झालेला जळराशि – हृदयांतील अनन्त सुखस्मृति जणुं तुम्हां-आम्हांला भक्तिभरानें कथन करीत आहे. संगम झाल्यानंतरहि भीमा आणि अमरजा यांच्या जलप्रवाहाच्या हिरव्या-तांबड्या रंगच्छटा किती तरी दूरपर्यंत वेगळीक राखून वाहत असलेल्या दिसतात. परमेश्वराशीं एकरूपता पावलेला भक्त जसा भक्तिप्रेम अनुभवण्यासाठीं देहपातापर्यंत वेगळा राहतो, तशीच ही अमरजेची अद्वैतांतील द्वैतस्थिति आहे, असें वाटतें. वृक्षांच्या छायेंत श्रीसंगमेश्वराचें मंदिर पूर्वाभिमुख उभें आहे. गगनाचा वेध घेणारीं पर्वत-शिखरें आणि जीवनें एकरूप बनविणारे सरितांचे संगम या स्थानीं शिवाचें सान्निध्य नेहमींच असतें. अशा स्थळीं हिंदु मनाला 'शिवा' चा साक्षात्कार होतो – कांहीं तरी दिव्य-भव्य आणि गहनगूढ जाणवतें आणि त्या जाणिवेचें प्रतीक शिवलिंगाच्या रूपानें



संगमेश्वराचें लिंग

नांदूं लागतें. भीमा-अमरजेच्या संगमावर नांदणारा हा संगमेश्वरहि आपल्या मनांत अशाच कांहीं गूढ भावना निर्माण करतो.

संगमेश्वराच्या मंदिरापुढें पूर्वाभिमुख अवस्थेंतच श्रीगुरूंचें मंदिर आहे. या मंदिराच्या जागींच तो पुरातन अश्वत्थ आणि



संगमावरील श्रीगुरु-मंदिर

श्रीगुरूंची अनुष्ठानभूमि होती. तो अश्वत्थ वृक्ष पडून गेल्यावर त्या जागीं शिवलिंग आणि पादुकांची स्थापना करून त्यावर मंदिर उभारण्याचें काम पुण्याचे सरदार बाळासाहेब रास्ते यांनीं केलें. अगदीं अलीकडेच मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून, मंदिराभोंवतीं कॉंक्रीटचा प्रशस्त सभामंडप उभा केला आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यांत मखरांत त्रिमूर्ति दत्त असून आसनाच्या तळवटीं पादुका विराजमान झालेल्या आहेत. या पादुकांच्या पूजेअर्चेची व्यवस्था गांवांतील हक्कदार पुजारीच पहात असतात.

मंडपासमोर एक तुळसी-वृंदावन असून त्यांत मारुतीची मूर्ति आहे. मंदिराच्या दक्षिणेस व उत्तरेस मिळून तीन धर्मशाळा आहेत. मंदिराच्या समोरील ओटयावर एक औदुंबराचें झाड होतें. ज्या नरहरी नामक कुष्ठग्रस्त भक्तास शुष्ककाष्ठास पाणी घालण्याची आज्ञा श्रीगुरूंनीं केली होती, त्या भक्ताच्या निष्ठेनें त्या शुष्ककाष्ठाला सात दिवसांनीं श्रीगुरूंच्या कमंडलूंतील जलसिंचनानें पालवी फुटली आणि त्याचाच पुढें महावृक्ष बनला. तो औदुंबर वृक्ष साठ-सत्तर वर्षांपूर्वी महापुरांत वाहून गेला.

या परिसराजवळच गांवाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूला 'भस्माचा डोंगर' आहे. तेथून शेंकडों यात्रिक भस्म लुटून नेतात, परंतु ती टेकडी कमी होत नाहीं, असें सांगतात.

हा सर्व परिसर श्रीगुरूंच्या पदस्पर्शानें पावन झालेला असल्यामुळें भाविकांचें आणि उपासकांचें हें परम श्रद्धास्थान बनलें आहे. या परिसरांत बसून गुरुचरित्राचें पारायण करण्याचें फळ विशेष मानलें जातें. यात्रिक आणि गाणगापुरांत कांहीं काळ वसति करून साधना आचरणारे उपासक यांचा ओघ रोज सकाळीं संगमाच्या वाटेवर आढळतो. गाणगापूरच्या नैमित्तिक कार्यक्रमांत कार्तिकी पौर्णिमेला संगमावर मोठा उत्सव साजरा होतो. पौर्णिमेच्या दिवशीं सकाळीं १० वाजतां गांवांतील उत्सवमूर्ति वस्त्राभूषणांनीं अलंकृत करून मध्यान्हीच्या सुमारास पालखी संगमाकडे निघते. गांवांतील मंदिराला एक प्रदक्षिणा घालून वाजत-गाजत मोठ्या थाटामाटानें मंद गतीनें ती वेशीपर्यंत आणतात. तेथें अनन्तकोटि ब्रह्मांडनायकाचा नाम-घोष केल्यावर पालखी त्वरेनें निघते, ती संगमाच्या कांहींशी अलीकडे विश्रांतिकट्ट्यावर विसांवते. त्या ठिकाणीं पुजाऱ्यांकडून प्रसाद वांटला जातो. तेथून निघाल्यावर संगमेश्वराच्या अलीकडे

ती थांबते. त्या ठिकाणीं सुवासिनी स्त्रिया पालखी वाहणारांच्या पायांवर पाणी घालून श्रीगुरूंना पंचारती ओवाळतात. नंतर ती ती संगमावरील मंदिरांत जाऊन विसांवते. मंदिरांत पालखी आल्यावर अभिषेक व महानैवेद्य होतो आणि भक्तमंडळी अन्न-प्रसाद स्वीकारतात. रात्रीं आरती आणि तीर्थप्रसादाचें वितरण झाल्यावर मध्यरात्रीच्या सुमारास पालखी पुन: गांवाकडे निघते. या वेळचें दृश्य हृदयंगम असतें. गावांतील मंदिरांत अनेक दिवे तेवत असतात आणि अनेक दिवट्या-मशालींच्या प्रकाशांत पालखी गांवाकडे चाललेली असते. त्या सोनेरी प्रकाशज्योतींत चंद्राचीं रजत किरणें मिसळून जातात आणि त्या रजत-सुवर्णाच्या संगमांत उजळलेली पाऊलवाट श्रीगुरूंच्या गौरवाची गाथा मुकेपणानें हृदयांत सांठवूं लागते.

## अष्टतीर्थांच्या सान्निध्यांत :

सत्पुरुषांच्या सन्निधानामुळें भूमीला आणि जलप्रवाहाला तीर्थरूपता प्राप्त होते. गाणगापूरच्या परिसरांत आणि संगमा-पासून गांवापर्यंत अष्टतीर्थांचें अस्तित्व आहे, असें गुरुचरित्रांत वर्णिलें आहे. गुरुचरित्राच्या ४८ व्या अध्यायांत ग्रंथकारानें प्रत्यक्ष श्रीगुरूंच्या मुखांतून अष्टतीर्थांचें महिमान व्यक्तविलें आहे. या अष्टतीर्थांतील स्नानाचें पुण्य त्रिस्थळी यात्रेच्या पुण्याइतकें समजलें जातें.

१. षट्कुळ तीर्थ हें तीर्थ प्रत्यक्ष संगमांतच आहे. या तीर्थाची निर्मिति अमरजेच्या अमृतमय स्वरूपांत आहे. षट्कुळ तीर्थांतील स्नानाचा महिमा प्रयाग-स्नानाइतका मानला जातो.

२ नरसिंह (मनोरथ) तीर्थ हें तीर्थ संगमावरील मंदिरा-समोरच्या भागीं आहे. या तीर्थांत स्नान करून श्रीसंगमेश्वराची पूजा केल्यास श्रीशैल-मल्लिकार्जुनाच्या पूजेचें फल प्राप्त होतें, असें मानलें जातें.

३ भागीरथी (वाराणसी) तीर्थ हें तीर्थ संगमापासून गांवापर्यंतच्या रस्त्याच्या मध्यभागीं भीमेला मिळणाऱ्या एका लहानशा प्रवाहांत आहे. या प्रवाहाचा उगम नागेशी गांवापासून झाला आहे. या तीर्थाच्या निर्मितीविषयीं गुरुचरित्रांत (४८·४६–६५) एक कथा आलेली आहे. या नागेशी गांवांत एक भारद्वाजगोत्री शिवोपासक ब्राह्मण राहत असे. सर्वसंगत्याग करून अनन्यभक्तीनें शिवाची उपासना केल्यामुळें त्याला शिव प्रसन्न झाला होता. तो शिवसाक्षात्काराच्या धुंदीमुळें विदेही मुक्ताप्रमाणें पिशाच्चवृत्तीनें राहत असे. त्याचें दिव्य अंतरंग न समजल्यामुळें बाह्याचारावरून लोक त्याला 'पिसा' म्हणत आणि त्याचा मनसोक्त उपहास करीत. त्याला 'ईश्वर' आणि 'पांडुरंगेश्वर' या नांवाचे दोघे भाऊ होते. ते दोघे एकदां काशीला निघाले आणि जाणि जातां जातां आपल्या 'वेड्या' भावालाहि बरोबर चलण्यास विचारूं लागले. अर्थातच त्या शिवसाक्षात्कारी ब्राह्मणानें काशीस चलण्यास नकार दिला आणि आपल्या भावांना तो म्हणाला,

"वेड्यांनो, शिवदर्शनासाठीं काशीला जाण्याची दगदग कशाला ? विश्वेश्वर तर सदैव माझ्याजवळ – माझ्या हृदयांत – वावरत आहे ! "

असें सांगून तो ध्यानस्थ झाला. भक्तीचा भुकेला भोळा शिव त्याच्या हांकेला धांवून आला आणि सर्वांच्या प्रत्यंतरासाठीं त्यानें एक तीर्थकुंड निर्माण केलें. त्या कुंडांतून विश्वेश्वराची मूर्ति प्रकट झाली. या स्पष्ट प्रत्ययानंतर ते दोघे बंधु आपल्या शिवस्वरूप भावाच्या चरणीं विसांवले. पुढें त्या शिवसाक्षात्कारी ब्राह्मणानें त्या दोघांना पंढरपुरास पांडुरंगाच्या उपासनेसाठीं पाठवून दिले. पंढरपूरचें 'आराध्ये' घराणें म्हणजे याच दोघां बंधूंचा वंश होय.

४. पापविनाशी तीर्थ श्रीगुरूंच्या आदेशानुसार या तीर्थांत त्रिरात्र स्नान केल्यामुळें श्रीगुरूंची बहीण रत्नाबाई हिचा कुष्ठरोग नाहींसा झाला, अशी कथा गुरुचरित्रांत वर्णिली आहे :

सिद्ध म्हणे नामधारकासी । आम्हीं देखिलें दृष्टीसीं ।
स्नान करितां त्रिरात्रीसीं । कुष्ठ तिचें परिहारिलें ।।
ऐसें प्रख्यात तीर्थ देखा । नाम पापविनाशी ऐका ।
जे स्नान करिती भाविका । सप्तजन्म-पापें जाती ।।
तीर्थमहिमा देखोन । रत्नाबाई संतोषोन ।
राहिली मग मठी बांधोन । तीर्थासन्निध अवधारा ।।

– गुरुचरित्र ४८.८३–८५

५. कोटितीर्थ या तीर्थांत स्नान करून दान केल्यास त्याचें कोटिगुणित पुण्य प्राप्त होतें, अशी श्रद्धा आहे. चंद्रसूर्य-ग्रहणें, संक्रांति, अमावास्या, पौर्णिमा, प्रतिपदा अशा पर्वणींना दान केल्याचें फळ विशेष मानलें जातें.

६. रुद्रपादतीर्थ : या तीर्थांतील स्नान गया-स्नानाच्या योग्यतेचें मानलें जातें. येथें विष्णुपद आहे. गयेप्रमाणेंच येथें श्राद्ध-क्षौरादि विधि केले जातात.

७ चक्रतीर्थ . हें तीर्थ गांवाजवळ असून याच्या सन्निध केशवदेवाचें स्थान आहे. या तीर्थांत स्नान करून केशव-देवाची पूजा केल्यास द्वारकायात्रेचें पुण्य प्राप्त होतें, अशी श्रद्धा आहे.

तया तीर्थीं स्नान करिता । पतित होती ज्ञानवंता ।।
अस्थि होती चक्रांकिता । द्वारावतीसमान देखा ।।

– गुरुचरित्र ४८ ९४

८ मन्मथ तीर्थ · गांवाच्या पूर्वेस दोन फर्लांगांवर असलेल्या कल्लेश्वराच्या मंदिरासमोर हें तीर्थ आहे. या तीर्थांत स्नान

करून कल्लेश्वराचें पूजन केल्यास गोकर्ण-महाबळेश्वराच्या यात्रेचें पुण्य प्राप्त होतें, असें मानलें जातें.

– या अष्टतीर्थांच्या महिमानाचा अर्थ इतकाच वाटतो कीं, अन्तःकरण शुद्ध असेल, तर ठायींच पुण्याची जोड करतां येईल. त्यासाठीं तीर्थभ्रमणाची आवश्यकता नाहीं. " मन चंगा तो काठवठमें गंगा ! "

## विश्रांतिकट्टा, तंतुकेश्वर आणि कल्लेश्वर

संगमाकडून गांवाकडे जातांना संगमापासून चार फर्लांगावर ' विश्रांतिकट्टा ' नांवाचें ठिकाण आहे. श्रीगुरु गांवांतून संगमाकडे जातांना आणि परत येतांना वाटेंत या ठिकाणीं अमळ विसांवत. सध्यां या ' विसांव्या'च्या जागेवर एक कट्टा बांधलेला आहे; त्यालाच ' विश्रांतिकट्टा ' म्हणतात. या ठिकाणीं आल्यावर यात्रिकांच्या जननान्तरींच्या स्मृति जणुं उमलून येतात आणि श्रीगुरूंची तेजोमय मूर्ति इथें विसांवलेली अन्तश्चक्षूंना दिसूं लागते. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीं शेतें लवलवत आहेत, शरदाचें स्निग्धशीतल वैभव अवकाशांत दाटून राहिलें आहे आणि पात्यांच्या हिरव्या पदराखालीं कणसांचे दुधाळ दाणे पोसले जात आहेत. श्रीगुरु या ठिकाणीं विसांवले कीं, शेजारच्या शेतांतला एक शेतकरी त्यांच्या चरणीं नमायचा आणि त्यांच्या कृपाघन दृष्टींतील अमृतांत नित्य न्हाऊन निघायचा. एके दिवशीं श्रीगुरूंनीं त्याला विचारलें,


" काय मागणें आहे तुझें ! "
" दुसरें काय मागूं ? हें शेत पिकूं द्या. "
" हें शेत पिकायचं, तर माझं एक सांगणं आहे. "
" सांगा, महाराज ! "

" आतांच्या आतां हें सारं पोटरीस आलेलं उभं पीक कापून टाक."

– श्रीगुरूंची आज्ञा त्या शेतकऱ्यानें शिरोधार्य मानली आणि कुणाचाहि विरोध न जुमानतां उभें पीक कापून टाकलें. नवल असें कीं, त्यानंतर लगेच अकालींच आकाश कोसळलें आणि पावसाच्या अचानक माऱ्यानें शिवारांतलीं सारीं पिकें सोडून पडलीं; परंतु श्रीगुरूंच्या आदेशाप्रमाणें पीक कापून टाकणाऱ्या शेतकऱ्याच्या शेतांत ताटांच्या बुडख्यांना धुमारे फुटले आणि त्या वर्षीच्या अस्मानी संकटांतून त्यानें आपल्या-बरोबर सर्व गांवालाहि जगवलें.

श्रीगुरूंच्या वास्तव दक्षतेची ही साक्ष पाहिली कीं, मन अतीव श्रद्धेनें भारावून जातें आणि तें या विश्रांतिकट्ट्याजवळ त्यांच्या चरणधुळीचा मागोवा घेऊं लागतें.

गांवाच्या उत्तरेस तंतुकेश्वर नांवाचें शिवस्थान आहे. गाणगापुरांत श्रीगुरूंच्या चरणांची सेवा करणाऱ्या लोकांत एक तंतिक (विणकर) होता. तो नित्याचा व्यवसाय आटोपल्यावर मठांत यायचा आणि मठासमोरील प्रांगणा-ची झाडलोट करून गुरुसेवेंत अल्पकाळ घालवायचा. एकदां शिवरात्रीच्या यात्रे-




तंतुकेश्वराचें लिंग

साठीं सारे लोक श्रीशैलाकडे निघाले. यात्रेला निघालेले लोक या तंतिकालाहि बरोबर चलण्याचा आग्रह करूं लागले. परंतु तो तंतिक गांव सोडण्यास तयार होईना. त्यानें उत्तर दिलें कीं,

" श्रीगुरु हेच माझे मल्लिकार्जुन आणि हें त्यांचें निवासस्थान म्हणजेच माझें श्रीशैल. गुरुचरण सोडून पाषाणाच्या दर्शनासाठीं धांवण्याची माझी इच्छा नाहीं. "

त्या तंतिकाचा दृढभाव पाहून श्रीगुरु प्रसन्न झाले आणि त्यांनीं संगमावर त्याला ध्यानमग्न बनवून मनोमय श्रीशैल-दर्शन घडविलें. त्याच्या दृढभक्तीचें स्मारक म्हणून हा तंतुकेश्वर गाणगापुरांत नांदतो आहे.

गांवाच्या पूर्वेस दोन मैलांवर कल्लेश्वर नांवाचें आणखी एक शिवस्थान आहे. हें स्थान हिप्परगी नांवाच्या गांवाच्या हद्दींत आहे. या गांवांतील एका भक्तानें एकदां श्रीगुरूंना अत्यादरपूर्वक आपल्या गांवीं नेलें. त्या गांवीं नरहरि कवीश्वर नांवाचा एक प्रतिभासंपन्न ब्राह्मण राहत होता. तो कल्लेश्वराचा उपासक होता. नित्य कल्लेश्वराची पूजा करून पूजेनंतर काव्यसुमनांची नित्य नवी ओंजळ शिवलिंगावर वहायची, असा त्याचा क्रम असे. श्रीगुरूंना हिप्परगीस घेऊन येणाऱ्या भक्तानें नरहरीला विनविलें कीं, " तुझीं थोडीं काव्यसुमनें गुरुदेवांच्या पूजेसाठीं दे. "



कल्लेश्वराचें लिंग


नरहरीनें उत्तर दिलें कीं, " माझी वाणी मीं कल्लेश्वराच्या उपासनेसाठीं वाहिलेली आहे – अन्य देवांची वा कुणाहि नराची स्तुति करण्यासाठीं मी तिचा वापर करणार नाहीं ! "

— आणि नवल असें कीं, त्या दिवशीं तो कल्लेश्वराच्या मंदिरांत पूजेसाठीं गेल्यावर पूजा करतां करतांच त्याच्या बाह्य जाणिवा मंदावल्या आणि तो स्वप्नसृष्टींत प्रविष्ट झाला. पाहतां पाहतां समोरचें शिवलिंग लुप्त झालें अन् त्या जागीं श्रीगुरूंची तेजोघन मूर्ति नरहरीच्या षोडशोपचारांचा सहर्ष स्वीकार करूं लागली. स्वप्नांतून भानावर आल्यावर नरहरीची एकांतिकता मावळून गेली आणि तो श्रीगुरूंना शिवस्वरूप मानून भजूं लागला. पुढें श्रीगुरूंच्या अंतिम दर्शनाच्या वेळीं उपस्थित असलेल्या चार शिष्यांत तोहि एक होता — एवढें त्याचें भाग्य !

कल्लेश्वराचें दर्शन घेतांना त्या दीपाकार शिवलिंगावर श्रीगुरूंच्या विभूतिमत्त्वाची ज्योत अमूर्तपणें तेजाळली आहे, असें क्षणैक जाणवूं लागतें.

## निर्गुण पादुकांचें दर्शन :


गाणगापुरांतील प्रमुख दर्शनीय स्थान म्हणजे श्रीगुरूंचा मठ अथवा निर्गुण पादुका-मंदिर. ग्रामाधिकाऱ्याच्या आग्रहावरून श्रीगुरु संगमावरून इथें — मठांत राहावयास आले. हा मठ गांवाच्या मध्यस्थानीं आहे. या मठाचें स्वरूप आजहि मंदिरा-सारखें नसून, धाब्याच्या प्रचंड घरासारखेंच आहे. मठाच्या पूर्वेस व पश्चिमेस दोन महाद्वारें आहेत. पश्चिम महाद्वार प्रशस्त असून त्यावर नगारखाना आहे. त्रिकाळ पूजेच्या वेळीं नगारा वाजवण्याची व्यवस्था आहे. मठाच्या पूर्वेस महादेव, दक्षिणेस औदुंबर व त्याखालीं गणपति, महादेव व पार्वती यांच्या मूर्ति आहेत. पश्चिमेस अश्वत्थवृक्ष आहे. अश्वत्थाच्या पारासभोंवतीं नागनाथ, मारुती व तुळशीवृंदावन आहे. उत्तरेस मारुती, गणपति व अश्वत्थ आहे. मठांत पूर्वेस पांच, पश्चिमेस एक व उत्तरेस सात अशा ओवऱ्या आहेत. या ओवऱ्यांतून



मठाचें पश्चिम महाद्वार

सेवेकरी लोक अनुष्ठान करीत असतात. मठाच्या दक्षिण भागीं उत्तराभिमुख श्रीगुरुपादुकांचा गाभारा असून गाभाऱ्यासमोर फरसबंदी केलेला प्रशस्त मंडप आहे. गाभाऱ्याला समोर मध्य भागीं दरवाजा नाहीं. आपल्या उजव्या हाताला दरवाजा आहे. या दरवाजानें आंत प्रवेशल्यावर गाभारा पश्चिमाभिमुख असल्याचें आढळतें. आंत पश्चिमेकडील कोनाड्यांत विघ्नहर चिंतामणीची वालुकामय मूर्ति आहे. मठप्रवेश करतेवेळीं श्रीगुरूंनीं स्वहस्तें या मूर्तीची स्थापना केली, असें सांगतात. म्हणूनच श्रीगुरूंच्या पादुकांच्या त्रिकालपूजेंत या विघ्नहराच्या पूजेचें महात्म्य विशेष आहे. गाभाऱ्यांत या विघ्नहरासमोर दक्षिणेच्या बाजूस पश्चिमाभिमुख लहान द्वार आहे. या द्वारांतून ओणव्यानेंच प्रवेश करतां येतो. याच भिंतीला अलीकडे एक लहानसा झरोका आहे. हा झरोका आणि हें लहानसें द्वार चांदीच्या पत्र्यानें मढविलेलें आहे. या झरोक्यांतून आंत डोकावल्यावर समोर पश्चिमाभिमुख अवस्थेंत आसनस्थ त्रिमूर्तीचें दर्शन घडतें. या त्रिमूर्तीच्या आसनावरच श्रीगुरूंच्या पादुका ठेवलेल्या असतात.

या पादुकांना ' निर्गुण पादुका ' अशी संज्ञा आहे. या शिळेवर कोरलेल्या नसून सुट्या आणि चल आहेत. त्या चांदीच्या दोन संपुष्टांत ठेवलेल्या आहेत. त्यांचें मूळ स्वरूप निश्चित काय आहे, तें सांगतां येत नाहीं. त्यांना पाण्याचा स्पर्श केला जात नाहीं. केवळ-कस्तुरी-अष्टगंधाचा लेप देतात. पहाटे पूजेच्या वेळेपासून दुपारीं महानैवेद्यापर्यंत या पादुका कोपऱ्यांतील लहान द्वारांत एका चौरंगावर ठेवतात आणि तेथून त्यांचें दर्शन सुलभतेनें घेतां येतें. गाभाऱ्यांच्या आंतल्या भागांत पुजाऱ्यांशिवाय अन्य कुणालाच प्रवेशण्याची परवानगी नसते. सर्व पूजोपचार पुजाऱ्याच्या स्वाधीन करायचे आणि नियुक्त दक्षिणा देण्याची तयारी असेल तरच स्वहस्तें तुळशीपत्र वा फूल दुरून वाहायचें – नाहीं तर केवळ डोळ्यांतून प्रकटणारी अंतरींची श्रद्धा समर्पून परत फिरायचें.



' निर्गुण ' पादुका

या मठांत श्रीगुरूंच्या अवतार–चरित्रांतील अनंत स्मृति सांठलेल्या आहेत आणि या निर्गुण पादुकांत त्यांच्या विभूति-मत्त्वाचें सारें तेज एकवटलेलें आहे. याच मठांत राहत असतांना श्रीगुरूंनीं अनंत आर्तांचीं सांकडीं दूर केलीं, अनेकांच्या हृदयांतील तिमिर नाहींसें केलें, अनेकांना प्रबोधाचा आणि चिरानंदाचा ठेवा प्राप्त करून दिला, अनेक मदमत्तांची आणि दांभिकांची वृत्ति बदलविली आणि बेदरच्या यवन बादशहाला प्रभावित करून महाराष्ट्रधर्मीं वर्तावयास लाविलें.

– आणि अखेर ते येथूनच श्रीशैलास गेले आणि माघ वद्य प्रतिपदा शके १३८० या दिवशीं शिवस्वरूप पावले. त्यांनीं स्वहस्तें ठेवलेल्या पादुकांचें महिमान भाविकांच्या हृदयांत अनन्यसाधारण असणें अगदीं स्वाभाविक आहे.

## श्रीगुरूंची चरणसेवा

दत्तोपासनेच्या क्षेत्रांत मूर्तीऐवजीं पादुकांचें महत्त्व फार आहे. मूर्तीचा विध्वंस करणाऱ्या मुसलमानांच्या आक्रमणापासून आपल्या श्रद्धास्थानांचें संरक्षण करण्यासाठीं मूर्तीऐवजीं पादुकांची उपासना रूढ झाली असावी. परंतु या प्रासंगिक परिस्थितिसापेक्ष कारणाहूनहि पादुकांच्या उपासनेंत साधनेच्या दृष्टीनेंहि विशेष अर्थ आहे, असें वाटतें. ज्या गुरुचरणांच्या सेवेमुळें साधकाला सिद्धीचें महाद्वार खुलें होतें, ज्या चरण-कमळांच्या कोशांत लीन होण्यासाठीं भक्तांचे मनोमिलिंद झेपावतात, त्या चरणांच्या प्रतीकाची उपासना करण्यांत एक विशेष औचित्य आहे. चरणप्रतीकांच्या उपासनेंत साधनेला आवश्यक असलेल्या विनयाची शिकवणहि पायाभूत आहे.

आणि या गाणगापूरच्या 'निर्गुण पादुका' तर प्रत्यक्ष श्रीगुरूंनीं आपल्या चिरविरहांत शिष्यांच्या सांत्वनार्थ दिलेल्या. त्या पादुकांत त्यांच्या अवताराचें सारें तेज जणुं घनीभूत झालेलें आहे. अष्टगंधाच्या लेपानें शोभणाऱ्या या पादुका श्रीगुरूंच्या अवताराचा गौरवगंध अजूनहि पसरवीत आहेत, असें क्षणैक वाटतें. या पादुकांच्या उपासनेसाठीं मुमुक्षूंची नित्य दाटी होत न राहिली तरच आश्चर्य !

श्रीगुरूंच्या कृपेला पात्र झालेल्या भास्कर ब्राह्मणाच्या घराण्यांत गाणगापूरच्या निर्गुण पादुकांची नित्यनैमित्तिक उपासना चालत आली आहे. नित्योपासनेचा प्रारंभ पहांटे तीन वाजल्यापासून होतो. प्रारंभीं काकडआरती होते. त्यानंतर आदल्या दिवशींच्या महापूजेचें विसर्जन करून ब्राह्मण पूजेला प्रारंभ करतात. पादुकांच्या पूजेपूर्वीं देवळांतील नारसिंह,

शाळिग्राम, दक्षिणावर्ती शंख, शिवलिंगें बाण इत्यादींवर महान्यास-लघुन्यासपूर्वक एकादशिनी होते. त्यानंतर निर्गुण पादुकांची पूजा होते. ही पूजा म्हणजे केवळ केशर-कस्तुरी-अष्टगंधाचें लेपन. बाकी सर्व पूजोपचार ताह्मनांत सोडायचे. पादुकांची पूजा झाल्यावर मग श्रीगणेशाची – विघ्नहर चिंतामणीची – पूजा होते. नंतर देवळासभोंवतीं असलेल्या गणपति, मारुती, औदुंबर, अश्वत्थ, नृसिंह सूर्यनारायण इत्यादि पूजा-स्थानांची पूजा होते. हें सर्व आटोपेपर्यंत सूर्योदयाची वेळ येते. सर्योदयाच्या सुमारास प्रातःकाळची आरती होते आणि उपस्थितांना तीर्थ व पंचामृत दिलें जातें. यानंतर मध्यान्हींच्या महानैवेद्याच्या वेळेपर्यंत बाहेरील सर्व दर्शनेच्छूंना दर्शन करण्यास व पूजा करविण्यास मोकळीक असते.

येथें रोजच महाराष्ट्र-कर्नाटकाच्या दूरदूरच्या भागांतून भक्त-भाविक लोक दर्शनार्थ येत असतात. पादुकांपुढें पूजा-द्रव्यांची नित्य खैरात होते. अनेक मस्तकें विनम्र होतात आणि पादुकांच्या क्षणदर्शनानें कांहीं तरी अलौकिक प्राप्त केल्याच्या भावनेनें भारावून जातात. आधि-व्याधींनीं ग्रस्त झालेले जीव दुःखमुक्तीसाठीं येथें येऊन राहतात आणि नित्योपासनेंत भाग घेऊन व गुरुचरित्राचीं पारायणें करून भिक्षेवर जगतात. येथें कांहीं काळ राहून सेवा केल्यानें आधि-व्याधींचें निरसन होतें, अशी महाराष्ट्रांत सार्वत्रिक श्रद्धा आहे. या श्रद्धेचा उगम गुरुचरित्रांतील अनेक चमत्कारांच्या कथांत झालेला आहे. श्रीगुरूंनीं अनेकांच्या अनेकविध दुःखांचा निरास लीलया केल्याच्या कथा गुरुचरित्रांत आहेत. त्याचमुळें प्रापंचिक दुःखांनीं व्यापलेले, महाव्याधीनें पीडलेले, पिशाचांनीं पकडलेले, वेड लागलेले आणि भव-सर्पाच्या डंखानें विव्हळणारे असे नाना प्रकारचे जीव येथें श्रीगुरुचरणांची कांस धरतात आणि सकाम भावनेनें सेवा करीत राहतात. मठांत दुपारीं १ वाजण्याच्या सुमारास महानैवेद्य झाल्यानंतर हे सर्व सेवेकरी भिक्षेसाठीं

बाहेर पडतात. अनेक सधन दत्तभक्त येथील तीर्थोपाध्यायांकडे ब्राह्मणभोजनांसाठीं व सेवेकऱ्यांना मधुकरी घालण्यासाठीं द्रव्य देऊन ठेवतात. रोज येथें येणाऱ्या यात्रिकांपैकीं जे सधन असतात, तेहि आपापल्या शक्यतेनुसार अन्नदानाची व्यवस्था करतात. येथें स्वखर्चानें राहणारे सेवेकरीहि व्रत म्हणून पांच घरीं मधुकरी मागतात.

महानैवेद्यानंतर पादुका गाभाऱ्याच्या दरवाजांतून हलवितात आणि आंत त्रिमूर्तीच्या आसनावर स्थानापन्न करतात. त्यानंतर पादुकांचें दर्शन झरोक्यांतून घ्यावयाचें असतें. संध्याकाळीं आठ वाजल्यानंतर सुमारें पाऊण तास आरती होते आणि मग–

इंदुकोटितेजकिरण सिंधुभक्तवत्सलम् ।
नंदनात्रिसुनुदत्तमिंदिराक्षश्रीगुरुम् ।
गंधमाल्यअक्षतादिवृंददेववन्दितम् ।
वन्दयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥

हें स्तोत्र म्हणत भालदार-चोपदारांसह पुजारी औदुंबर, अश्वत्थ, गणपति, मारुती इत्यादींची आरती करीत तीन प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर रात्रीं विडा, शेजारती आणि पंचपदी भजन होऊन रात्रीं ११ वाजण्याच्या सुमारास नित्योपासना समाप्त होते.

येथें दर गुरुवारीं रात्रीं पालखी निघते. प्रथम आरती करून वस्त्रालंकारांनीं विभूषित केलेली उत्सवमूर्ति पालखींत आणून बसवितात. मग उपासनाक्रमांत नियुक्त केलेलीं पदें म्हणत म्हणत पालखी मंदिरासभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालते आणि नंतर ती मूळ जागेवर आणून ठेवतात. नंतर पुनः आरती झाल्यावर उत्सवमूर्ति गाभाऱ्यांत नेतात. त्यानंतर नित्याप्रमाणें विघ्नहर चिंतामणीची आरती व श्रीगुरूंची कापुरआरती होते

व मंत्रपुष्पांजुळी वाहिल्यावर सर्वांना तीर्थप्रसाद व अंगारा देतात. आंत मंत्रपुष्पांजुळी वाहिली जात असतां बाहेर मंडपांत श्रीवासुदेवानंद सरस्वतीकृत 'करुणात्रिपदी' म्हटली जाते. पालखीचा कार्यक्रम यात्रिकांनीं स्वखर्चानें करण्याचें ठरविल्यास गुरुवारशिवाय अन्य दिवशींहि होऊं शकतो.

या नित्योपासनेशिवाय अनेक नैमित्तिक उत्सव व दिनविशेष येथें साजरे होतात. वर्षप्रतिपदा (चैत्र शुद्ध १), नरसिंहजयन्ती (वैशाख शुद्ध १४), दशहारानिमित्त (ज्येष्ठ शुद्ध १ ते १०) भीमा-पूजन, चातुर्मास-प्रारंभानिमित्त (आषाढ शुद्ध १५) यति-पूजन, श्रावण शुद्ध १ पासून १५ पर्यंत शिवलिंगावर रुद्राभिषेक, भाद्रपद शुद्ध ४ (गणेश-चतुर्थी) या दिवशीं श्रीपाद श्रीवल्लभ (पहिले दत्तावतार) यांचा जन्म-महोत्सव, विजयादशमी (आश्विन शुद्ध १०), आश्विन वद्य ७ या दिवशीं श्रीरामचंद्रमहाराज गोबूरकर यांची पुण्यतिथि, आश्विन वद्य १२ (गुरुद्वादशी) या दिवशीं श्रीवल्लभांचें पुण्यस्मरण, आश्विन वद्य १४ (नरक चतुर्दशी) या दिवशीं अष्टतीर्थस्नानें, कार्तिक शुद्ध १५ व कार्तिक वद्य १ या दोन दिवशीं संगमावरील वनभोजन, मार्गशीर्ष शुद्ध १४ या दिवशीं श्रीदत्तजयन्ती, पौष शुद्ध २ या दिवशीं श्रीनरसिंह सरस्वतींचा जन्मोत्सव, माघ शुद्ध १ पासून १५ पर्यंत माघी नवरात्राचा उत्सव, माघ वद्य १ ते ४ श्रीनरसिंह सरस्वतींच्या पुण्यस्मरणाचा सोहळा, माघ वद्य १४ या दिवशीं शिवरात्र्युत्सव आणि फाल्गुन वद्य ५ या दिवशीं रंगोत्सवानिमित्त होणारी पादुकांची महापूजा व केशराच्या रंगाचें सिंचन – असे अनेक नैमित्तिक कार्यक्रम सर्व वर्षभर विखुरलेले असतात.

या सर्व नैमित्तिक कार्यक्रमांत विशेष महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे श्रीगुरूंच्या पुण्यस्मरणाचा. माघ वद्य प्रतिपदेपासून माघ

वद्य चतुर्थीपर्यंत चार दिवस हा सोहळा चालू असतो. या वेळीं येथें दहा हजारांवर जनसंमर्द गोळा होतो. पौर्णिमेच्या दिवशीं पहांटे ५ वाजतां गाभाऱ्यांत असणाऱ्या निर्गुण पादुका श्रीविघ्नहर चिंतामणीच्या सन्निध देव्हाऱ्यांत आणून ठेवतात. त्यानंतर प्रतिपदेच्या दिवशीं प्रातःकाळची पूजा होईपर्यंत दर्शनाला बंदी असते. प्रतिपदेच्या दिवशीं प्रातःकाळची पूजा आटोपल्यावर पादुका पुनः गाभाऱ्याच्या द्वारांत ठेवतात आणि मग दर्शनार्थ लोकांची झुंबड उडते. सकाळीं ६ वाजल्यापासून सायंकाळीं ६ वाजेपर्यंत भाविकांचा मेळावा दर्शन व पूजा करून घेत असतो. दुपारीं ४ वाजतां मंडपांत श्रीगुरूंच्या पुण्यस्मरणार्थ यति-पूजेचा समारंभ होतो. यतींची पाद्यपूजा आटोपल्यावर सर्व मंडळी नदीकांठच्या केशवदेवस्थानाच्या पटांगणांत जेवावयास बसतात. माघ वद्य २, ३ व ४ या दिवशींहि अन्नसंतर्पणाचा मोठा कार्यक्रम होतो. माघ वद्य ४ या दिवशीं दुपारीं १२ वाजतां देवळांत गोपाळकाला होऊन श्रीगुरूंची पालखी थाटामाटानें वाजत गाजत नदीवर स्नानासाठीं जाते. श्रीगुरूंच्याबरोबर स्नानाचा आनंद लुटावयास मिळवण्यासाठीं हजारों लोक भीमेच्या पात्रांत उतरतात. हा स्नान-सोहळा विराट् स्वरूपाचा असतो. पुजारी श्रीगुरूंच्या खडावांवर रुद्राभिषेक करतात आणि नंतर गोपाळकाल्याचा प्रसाद सर्वांस वांटतात. त्यानंतर भजनाचा गजर करीत पालखी मंदिरांत आणतात.

## हरपल्या श्रेयाचा शोध :

जनश्रद्धेचा एवढा प्रचंड ओघ आणि नित्य-नैमित्तिक उपासनेचें एवढें प्रचंड कर्मकांड असूनहि गाणगापूरच्या वातावरणांत कांहीं तरी हरवल्यासारखें वाटतें. विवेकी मनाला कांहीं तरी बोचतें, खटकतें. श्रीगुरूंच्या विभूतिमत्त्वाचें तेज आणि त्यांच्या चिरप्रेरक स्मृतींचा सुगंध येथील [illegible] आणि

[illegible]
मुद्रक. [illegible]

कर्मकांडाच्या पसाऱ्यांत लुप्त होऊन गेला आहे, असें वाटतें. ज्या श्रेयाचा शोध घेण्यासाठीं मन आतुर झालेलें असतें, त्या श्रेयाची वाट या आंधळ्या श्रद्धेनें आणि निर्जीव कर्मकांडानें झांकोळून टाकली आहे, असें दिसून येतें. ज्या संगमावर श्रीगुरूंनीं अनुष्ठान केलें, त्याच जागीं वृक्षांच्या छायेंत एखाद-दुसरा 'संन्यासी' जमिनीवर पहुडून आणि आकाशाकडे दृष्टि लावून मुखांतून धूम्रवलयें सोडीत असलेला दिसतो तेथेंच गुरुचरित्राचीं पारायणें करीत बसलेल्या भाविकांची दृष्टि नुसती अक्षरांवरून फिरत असते आणि जीभ केवळ शब्द उच्चारीत वळवळत असते. त्याच ग्रंथांत सामावलेलें श्रीगुरूंचें अलौकिक लीलाचरित्र त्यांच्या चिन्तनाचा विषय बनूं शकत नाहीं. गांवांतील मठांत श्रीगुरूंच्या आकाशाएवढ्या हृदया-सारखी स्वच्छता असावयास हवी, त्यांच्या विभूतिमत्त्वाच्या नेत्रदीपक स्वरूपासारखा प्रकाश पसरलेला हवा, त्यांच्या गगनगामी गौरवासारखा सुगंध दरवळलेला हवा आणि त्यांच्या करुणामय वृत्तीप्रमाणें जनहितैषी निर्मळ वृत्ति नांदावयास हवी-स्वार्थनिरपेक्ष सहकार आणि आत्मशुद्धीची तळमळ या मठाच्या परिसरांत सतत आढळावयास हवी.

परंतु असें दिसत नाहीं. दिसतें तें सारें विपरीत. मठाच्या परिसरांत स्वच्छता ठेवली जात नाहीं. एके काळीं संरक्षणाच्या विशिष्ट हेतूनें बनविलेला, पुढें दार नसलेला गाभारा आजहि उरीं तेलकट अंधार सांठवून उभा आहे – भाविकांच्या आंधळ्या श्रद्धेचें नि मेणचट सकामतेचें जणुं तें प्रतीकच आहे. आणि पादुकांच्या दर्शनासाठीं झेपावणाऱ्या सहस्रावधि जनांच्या श्रद्धेचें शुद्धीकरण करण्याऐवजी, त्यांच्या दर्शनओढीनें हर्षोत्फुल्ल होण्याऐवजीं त्यांच्याकडून मिळणाऱ्या समर्पणद्रव्याच्या हक्का-साठीं लाचावलेले 'हक्कदार' पाहिले कीं, मन अस्वस्थ होतें. श्रीगुरूंच्या स्मृतिचिन्हांचा असा 'व्यापार' कोणत्या विवेकी



श्री नरसिंह सरस्वती
( शके १३००-१३८० )

मनाला स्थिरपणानें पाहवेल ? ज्याची वृत्ति अपरिग्रही आहे, जो सदैव वाट चुकलेल्या जीवांना प्रकाश दाखविण्यासाठीं स्वयमेव भ्रमण करीत आहे, सर्व विश्व ज्याला गुरुमय आहे आणि जो सर्वांचा गुरु आहे, तो अवधूत दिगंबर दत्तात्रेय या वातावरणांतून कसा प्रतीत व्हावा ? गाणगापूरला जाऊनहि जें हवें तें गवसलें नाहीं, म्हणून अस्वस्थ झालेलें मन भीमेच्या कांठीं भिरभिरूं लागतें; त्या पुण्यसरितेच्या तीरावरील तरुवेलींना दर्शनाची साक्ष पुसूं लागतें. जें पुजाऱ्यांच्या भावशून्य मंत्रोच्चारांत जाणवत नाहीं, जें मठाच्या आवारांत आढळत नाहीं, जें भाविकांच्या गर्दींत हातीं लागत नाहीं, तें भीमा-अमरजेच्या प्रीति-संगमांत उमलून येतें. चिंतनांत अन्तर्मुख झालेल्या दृष्टींत त्या आगळ्या दर्शनानंदाचा फुलोरा फुलतो आणि निराश झालेल्या हृदयांत संगमांतील लहरीप्रमाणें आनंदाचे कल्लोळ उसळूं लागतात. आपलें हृदय अमरजेच्या इवल्याशा प्रवाहाप्रमाणें विराट् जीवनांत विलीन होण्यासाठीं वेगानें झेपावूं लागतें आणि त्याच क्षणीं श्रीगुरूंच्या ' निर्गुण पादुकां 'ना आपण ओझरता स्पर्श केला आहे, असें आंतल्या आंत क्षणभर जाणवतें.

• • •

## या त्रि कां शीं हि त गु ज

**गाणगापूरचा प्रवास :**

गाणगापूर हें पुणें-रायचूर लोहमार्गावर, पुण्यापासून २१८ मैलांवर आहे. हें स्थान कानडी प्रदेशांत (जिल्हा गुलबर्गा, म्हैसूर राज्य) असल्यामुळें सोलापूर सोडल्यापासूनच कानडी वातावरणाची जाणीव होऊं लागते. गाणगापूरच्या स्टेशनवर उतरल्यावर, यात्रिकांच्या सदयतेला आणि दानवृत्तीला आवाहन करणारे भिकारी कानडी गुरुगीतें गातांना आढळतात. गाणगापूर येथें जाणाऱ्या-येणाऱ्या सर्व गाड्या थांबतात. महाराष्ट्र-कर्नाटकाच्या दूरदूरच्या भागांतून अनेक यात्रिक रोज गाणगापूरला येत असतात. पंढरपूरप्रमाणेंच हें नित्य यात्रा चालू असलेलें स्थान आहे. स्टेशनवर श्रीमदद्वैतानन्द बाल-ब्रह्मचारी यांनीं बांधलेली एक धर्मशाळा आहे.

स्टेशनपासून श्रीक्षेत्र गाणगापूर चौदा मैल अंतरावर आहे. स्टेशनपासून क्षेत्रांत जाण्यासाठीं सध्यां म्हैसूर राज्याच्या बसेस् चालू आहेत. रेल्वे-गाड्यांच्या वेळां लक्षांत घेऊनच ही बसेसची व्यवस्था आहे. पुणें ते गाणगापूर हा प्रवास पॅसेंजर गाडीनें १२ तासांचा असल्यामुळें रात्रीच्या गाडीनें निघणें सोयीस्कर होतें. सध्यां रात्रीं ९–४० वाजतां पुण्याहून निघणारी गाडी दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजण्याच्या सुमारास गाणगापूर स्टेशनवर पोंचते. स्टेशनवर बस उभीच असते. जास्त गर्दी असल्यास (आणि ती असतेच) लागोपाठ दोन बसेस सोडण्याचीहि व्यवस्था होते. रविवारीं स्टेशनवर बाजार असतो. बसमध्यें जागा न मिळाल्यास किंवा बसच्या वेळां-शिवाय अन्य वेळीं गेल्यास बैलगाडी किंवा घोडेंहि मिळूं शकतें. स्टेशनपासून क्षेत्रापर्यंतचा मार्ग अगदीं सरळ रेषेंत आहे.

उतरण्याची व्यवस्था :

इतर क्षेत्राप्रमाणेंच इथेंहि तीर्थोपाध्यायांकडे उतरण्याची व्यवस्था होते. गांवांत येऊन पोहोंचतांच मोटारींतून उतरल्या-बरोबर तीर्थोपाध्यायांची गर्दी आढळते. गांवांतील दोन-तीनशें घरांपैकीं पंचवीस-तीस घरें या तीर्थोपाध्यायांचीं आहेत. तीर्थोपाध्यायांकडे उतरावयाचें नसल्यास गांवांत एकदोन लहान धर्मशाळा आहेत आणि अलीकडे उभारली गेलेली, आधुनिक पद्धतीनें बांधलेली एक प्रशस्त धर्मशाळाहि आहे. या धर्मशाळेचें नांव "चिदानन्द धर्मशाळा" असें आहे. साऱ्या गाणगापुरांत या धर्मशाळेची वास्तु डोळ्यांत भरण्यासारखी आहे. या धर्मशाळेच्या उभारणीचा इतिहास अत्यंत आश्चर्य-कारक आहे. सुमारें अर्ध शतकापूर्वी मोगलाईंतल्याच धर्माबाद नांवाच्या गांवांतून चिदानन्दस्वामी या नांवाचे एक योगी गाणगापुरीं आले. गाणगापुरांत त्यांचें वास्तव्य केवळ सहा-सात महिने होतें. या काळांत त्यांनीं येथील परिसरांत आपल्या विभूतिमत्त्वाचा अन् योगसामर्थ्याचा विराट् प्रत्यय घडविला. नंतर त्यांनीं इथेंच भीमेच्या कुशींत जलसमाधि स्वीकारली (सुमारें श. १८३५). त्यांचा पार्थिव देह जवळच्याच इटगी (इष्टगापूर) या गांवीं किनाऱ्याला लागला. तिथल्या पाटलानें स्वप्न-दृष्टान्तानुसार त्यांचा देह काढून त्यावर समाधि उभारली. त्या समाधीपुढें विनम्र होऊन इष्टयाचना कर-णाऱ्यांना कल्पवृक्षातळीं आसरा घेतल्यासारखा अद्भुत प्रत्यय येऊं लागला आणि चिदानंदांच्या गौरवगंधानें आकृष्ट झालेल्या लाखों भक्तभ्रमरांनीं वर्ष-दीड वर्षाच्या अवधींत त्यांच्या समाधि-शिळेपुढें सव्वालक्ष रुपयांचें श्रद्धाद्रव्य वाहिलें. निजाम सरकारच्या तिजोरींत जमा झालेलें हें द्रव्य प्रयत्नपूर्वक परत

मिळवून कांहीं सत्प्रवृत्त योजकांनीं गाणगापुरास भीमाभिमुख अवस्थेंत ही सुंदर आणि सुखकारक धर्मशाळा बांधली.

या धर्मशाळेंतील स्वतंत्र खोल्या अल्प भाड्यानें रहावयास मिळतात. मोठ्या यात्रेचे दिवस नसतील तर चार-सहा दिवसहि येथें राहतां येतें आणि सेवेचा व तीर्थनिवासाचा आनंद मुक्तपणें उपभोगतां येतो. धर्मशाळेंत भांडींहि भाड्यानें मिळतात.

## श्रीगुरूंचा पंचशताब्दी महोत्सव :

श्रीगुरूंचें निर्याण माघ वद्य १, शके १३८० (१९ जानेवारी १४५९) या दिवशीं घडलें. त्या घटनेला या वर्षी (माघ वद्य १, शके १८८० २४ फेब्रुवारी १९५९) पांचशें वर्षे पूर्ण होत आहेत. हा सुवर्णदिन साजरा करण्यासाठीं गेल्या वर्षी " श्रीनरसिंह सरस्वती पंचशताब्दी महोत्सव मंडळ " निर्माण झालें आहे. या महोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्रीप्रभुदास (श्रीमाणिक प्रभु संस्थान, श्रीक्षेत्र माणिकनगर) हे भक्तिपरायण, लोकसंग्राहक आणि योजक गृहस्थ आहेत. त्यांच्या समर्थ नेतृत्वाखालीं आणि गाणगापूर देवस्थान कमिटीचे अध्यक्ष असलेले गुलबर्गा जिल्ह्याचे कलेक्टर यांच्या मार्गदर्शनाखालीं या महोत्सवमंडळानें जीर्णोद्धाराच्या, दत्तोपासनाविषयक वाङ्मयप्रकाशनाच्या आणि उत्सवासंबंधींच्या अनेक योजना आंखल्या. परंतु या सर्व योजनांच्या परिपूर्तीसाठीं आवश्यक असणारें द्रव्य (सुमारें पांच लाख रुपये) अपेक्षित असूनहि गोळा होऊं शकलें नाहीं. कर्नाटक-महाराष्ट्राच्या सर्व भागांत लाखों दत्तभक्त पसरलेले असतांना केवळ पांच लाखांची रक्कमहि एखाद्या योजनाबद्ध धर्म-कार्यासाठीं जमूं नये, हें इष्ट वाटत नाहीं.

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

१. सुंदर तें ध्यान : पंढरपूरचा पांडुरंग
२. जय जय रघुवीर समर्थ : समर्थांचा सज्जनगड
३ ज्ञानोबा माऊली : ज्ञानदेवाची आळंदी
४ एका जनार्दनी : एकनाथाचें पैठण
५. मल्हारी मार्तंड : जेजुरीचा खंडोबा
६. तुका झालासे कळस : तुकारामांचें देहू

सहा पु : प्र. ६० न.पै.
संच १ ला : रु. ३-६०

१ श्रीगोवे, भवताप हरी : त्र्यंबकेश्वर; नाशिक
२ मंगलमूर्ति मोरया : मोरया गोसाव्यांचें चिंचवड
३. जय जगदंब : कोल्हापूरची अंबाबाई
४ गुरुदेव दत्त : नरसोबाची वाडी, औदुंबर
५. जय भवानी ! : तुळजापूरची भवानी
६. माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें नेवासें

सहा पु. : प्र. ६२ न पै.
संच २ रा : रु. ३-७२

१. गोमांतकाची शांतिशक्ति : शांतादुर्गा (कवळें)
२. पार्वतीपते ! हर हर महादेव : श्रीमंगेश
३. ' डाकिन्यां भीमशंकरम् ' . भीमाशंकर
४ दलितांचा कैवारी भार्गवराम परशुराम
५. छत्रपतींचें कुलदैवत शिखर शिंगणापूर
६. श्रीगुरूचें गंधर्वपूर गाणगापूर

सहा पु. : प्र. ६२ न.पै.
संच ३ रा : रु. ३-७२

## वि द र्भ प रि स र

१. मंदिरमाला मुक्तागिरी : मुक्तागिरी
२. इथे टेकले श्रीराम : रामटेक
३. ' उदयोऽस्तु अम्बे ! ' अमरावती
४. विदर्भ-बद्री : कौंडिण्यपूर
५. अगस्त्यांचें संस्कृति केंद्र सालबर्डी
६. चंद्रपूरची महाकाली चन्द्रपूर
७ शे
८. स्व

REFBK-0012994

आठ पुस्तकें : प्र. ६५ न.पै.
संच ४ था : ५-२०

सर

१. [illegible] जगन्माता माहूर
२. बारावें ज्योतिर्लिंग वेरूळ
३. योगेश्वरीचें माहेर आम्बेंजोगाई
४. ' परल्यां वैद्यनाथं ' च परळी वैजनाथ
५. ' नागेशं दारुकावने ' : औंढ्या नागनाथ
६. दक्षिणद्वार देवगिरी : दौलताबाद

सहा पुस्तकें . प्र. ६५ न.पै.
संच ५ वा : रु. ४-००

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन–माला : ३४ पुस्तकें, पांच संच. रु. २०–२४ न.पैसे